# आत्मनिर्भर भारत

## भाग-1 : व्यवसाय (सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसहित)

**13.05.2020**

सत्यमेव जयते

Government Of India



# पंतप्रधानांची दूरदृष्टी

- **आत्मनिर्भर भारत अभियानाची साद.**
- **आत्मनिर्भर भारताचे पाच स्तंभ – अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, प्रणाली, कार्यक्षम लोकसंख्या** आणि **मागणी.**
- **20 लाख कोटी रुपयांचे विशेष आर्थिक** आणि **सर्वसमावेशक पॅकेज- भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या 10%** इतके.
- **कुटिर उद्योग, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, मजूर, मध्यम वर्ग, उद्योग यासह इतर क्षेत्रांना मदत करणारे पॅकेज.**
- या सर्व क्षेत्रातील **धाडसी सुधारणा** देशाला स्वावलंबनाकडे नेतील.
- **स्थानिक उत्पादनांचा प्रचार** करून ते **जागतिक** बनविण्याची वेळ.



# प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज (1)

कोरोना विरुद्धच्या लढ्यात मदत म्हणून गरीबांसाठी ‘प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज’ अंतर्गत 1.70 लाख कोटी रुपयांचा मदत निधी:

- आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येकी रुपये **50 लाखांचा विमा**
- पुढील 3 महिन्यासाठी 80 कोटी गरीब जनतेला प्रत्येकी **5 किलो गहू** किंवा तांदूळ
- पुढील 3 महिने **प्रत्येक कुटुंबाला** दरमहा **मोफत 1 किलो डाळी**
- पुढील 3 महिने 20 कोटी जन-धन खातेधारक महिलांना दरमहा रुपये 500
- पुढील 3 महिने 8 कोटी गरीब कुटुंबांना **मोफत गॅस सिलेंडर**
- 13.62 कोटी कुटुंबांना लाभ देत **मनरेगा वेतनात** रुपये 182 वरून **वाढ** करून रुपये 202 प्रति दिन
- 3 कोटी **गरीब ज्येष्ठ नागरिक, विधवा** आणि **दिव्यांग** यांना रुपये 1 हजाराचे सानुग्रह अनुदान









# प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज (2)

- 8.7 कोटी शेतकऱ्यांना लाभ देत प्रधानमंत्री किसान योजनेअंतर्गत **रुपये 2000 शेतकऱ्यांना प्रदान**
- **बांधकाम मजूरांना दिलासा** देण्यासाठी **इमारत व बांधकाम कामगार कल्याण निधी** वापरण्यास परवानगी
- 100 पेक्षा कमी कर्मचारी असणाऱ्या उद्योगातील दरमहा रुपये 15,000 पेक्षा कमी वेतन असणाऱ्यांना **मासिक वेतनाच्या 24% रक्कम** पुढील 3 महिने त्यांच्या **पीएफ खात्यात जमा** केली जाणार
- **कामगार भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ)** अंतर्गत **5 कोटी** नोंदणीकृत कामगारांच्या खात्यावर 3 महिन्यांसाठी **75% अग्रिम रक्कम** जमा
- **महिला बचत गटांना** कोणत्याही तारणाशिवायचे कर्ज रुपये 10 लाखाहून रुपये **20 लाख**; याचा लाभ **6.85 कोटी कुटुंबांना**.
- **जिल्हा खनिज निधी (DMF)चा** वापर वैद्यकीय चाचणी, तपासणी इ. साठी






# इतर उपाय - 1

- केंद्र सरकारच्या विनंतीनूसार भारतीय रिझर्व्ह बँकेने राज्यांची **‘वेज अँड मिन्स’ अग्रिम मर्यादा 60 टक्क्यांनी तसेच ओव्हरड्राफ्ट कालावधी मर्यादा वाढविली**
- **5 लाखांपर्यंतचे प्रलंबित आयकर परतावे दिले गेले**, याचा सुमारे 14 लाख करदात्यांना तत्काळ लाभ.
- सर्व प्रलंबित परतावा आणि ‘ड्राबॅक’ दावे यांच्यासाठी **"स्पेशल रिफंड व ड्राबॅक डिस्पोजल मोहिम"** लागू.
- वरील दोन्ही उपाययोजनांसाठी **18,000 कोटी रुपयांचा** परतावा.
- आकस्मित आरोग्य प्रतिसाद पॅकेजसाठी रुपये 15,000 कोटी मंजूर.



# इतर उपाय– 2

- **वैधानिक आणि अनुपालन प्रकरणात दिलासा**, जसे की–
  - आयकर परतावा भरण्यासाठी शेवटची तारीख 30 जून 2020 पर्यंत वाढविली.
  - जीएसटी  परतावा भरण्याची तारीख जून 2020च्या शेवटापर्यंत वाढविली.
  - 30 जून 2020 पर्यंत 24*7 सीमाशुल्क निराकरण
  - पुढील 3 महिन्यांसाठी डेबिट कार्ड धारकांना कोणत्याही एटीएम मधून विनाशुल्क पैसे काढण्याची सुविधा
  - वाहन व आरोग्य विमा पॉलिसीमध्ये पैसे भरण्यासाठी 15 मे 2020 पर्यंतची मुदत
  - 30 सप्टेंबरपर्यंतच्या अनिवार्य ‘बोर्ड मिटिंग्स’ना 60 दिवसांची मुदतवाढ
  - विशेष सर्वसाधारण सभा ‘व्हिडिओ कॉन्फरन्स’द्वारे ‘ई-वोटिंग’ सह घेण्यास परवानगी



# भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या उपाययोजना

- रोख राखीव प्रमाणात (CRR) कपात केल्यामुळे तरलता वाढ **₹1,37,000 कोटी**
- लक्ष्यित दीर्घ कालावधी रेपो कार्यक्रमांमधून (TLTROs) ₹1,00,050 कोटींची कॉर्पोरेट बाँडस, कमर्शिअल पेपर,  अ-परिवर्तनीय रोखे यात नव्याने गुंतवणूक
- 50,000 कोटी रुपयांचा TLTRO चा गुंतवणूकीसाठी वापर करुन इनव्हेस्टमेंट ग्रेड बाँडस, कमर्शिअल पेपर आणि गैर बँकींग वित्तीय संस्था आणि सुक्ष्म वित्तीय संस्थांच्या अ-परिवर्तनीय डिबेंचर्समध्ये गुंतवणूक.
- बँकांची तात्काळ कर्ज घेण्याची क्षमता,  सीमांत स्थायी सुविधेअंतर्गत (MSF), वाढवली, यामुळे बँकींग व्यवस्थेमध्ये अतिरिक्त ₹1,37,000 कोटी रुपयांची तरलता निर्माण झाली, तसेच सीमांत स्थायी सुविधा दरात कपात झाली.



# भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या उपाययोजना

- नाबार्ड, सिडबी आणि एनएचबीला विशेष पुनर्वित्त सुविधेअंतर्गत पॉलीसी रेपो रेट च्या माध्यमातून एकूण **₹50,000 कोटी**
- म्युचूअल फंडसना विशेष लिक्वीडिटी सुविधे **(SLF) अंतर्गत ₹50,000 कोटी** रुपये.
- सर्व मुदत कर्जासाठी तीन महिन्याचे हप्ते आणि कार्यकारी भांडवल सुविधेवर तीन महिन्यांची सूट
- मार्जिनमध्ये कपात करुन कार्यकारी भांडवल वित्तीय सुविधेत सुलभता
- गैर वित्तीय बँकींग संस्थांकडून व्यावसायिक रिअल इस्टेट क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या कर्जासाठी प्रत्यक्ष कामाच्या सुरुवातीला लागणाऱ्या मुदतीत एक वर्षाची वाढ **(DCCO)**



# लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योगांसह व्यवसाय

1. रु 3 लाख कोटींचे MSME सह व्यापाऱ्यांना तारणाशिवाय स्वयंचलित कर्ज
2. रु 20,000 कोटींची MSMEs ना गौण कर्ज
3. रु 50,000 कोटी MSME निधीच्या माध्यमातून इक्वीटी वृद्धी
4. MSMEs साठी नवीन निकष
5. जागतिक टेंडरची मर्यादा रु 200 crores
6. MSMEs साठी इतर अनेक सुविधा
7. भविष्य निर्वाह निधीच्या माध्यमातून रु 2500 कोटीची व्यावसायिक आणि कामगारांना 3 महिन्यांसाठी मदत
8. व्यावसायिक आणि कामगारांसाठी ईपीएफ कपात 3 महिन्यांसाठी- रु 6750 कोटी
9. रु 30,000 कोटींची तरलता सुविधा NBFC/HCs/MFIs साठी
10. रु 45,000 कोटींची गैर वित्तीय बँकींग महामंडळासाठी आंशिक हमी योजना 2.0
11. डिस्कॉमसाठी रु. 90,000 कोटी रुपयांची तरलता मदत
12. कंत्राटदारांना दिलासा
13. रेरा अंतर्गत नोंदणी आणि पूर्णत्वासाठी प्रकल्पांना मुदतवाढ
14. रु. 50,000 कोटींची तरलता TDS/TCS कपातीच्या माध्यमातून
15. इतर प्रत्यक्ष कर उपाययोजना

# एमएसएमई सह उद्योगांना 3 लाख कोटी रुपयांचे तारणाशिवाय स्वयंचलित कर्ज

- उद्योग/एमएसएमई यांना COVID19 चा फटका बसला आहे, त्यामुळे त्यांना कच्चा माल आणून व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे
- **निर्णय**: उद्योग/एमएसएमई यांना गैर वित्तीय बँकिंग संस्था, सुक्ष्म वित्तीय संस्था यांच्याकडून आकस्मिक क्रेडिट नूसार एकूण थकबाकीच्या **20% रक्कम 29.2.2020 पर्यंत**
  - खरेदीदार ज्यांची थकबाकी रु.25 कोटी आहे आणि रु.100 कोटींचा व्यवसाय आहे, ते पात्र
  - कर्जासाठी **4 वर्षांची मुदत, यात मुख्य भांडवलावर कर्जफेडीला 12 महिन्यांची मुदतवाढ**
  - **व्याजदरात सूट**
  - **बँक आणि** NBFCs यांना भागभांडवल आणि व्याजावर **100% पत हमी**
  - योजनांचा लाभ **31 ऑक्टोबर 2020 पर्यंत**
  - **हमी शुल्क आणि नव्या तारणाची आवश्यकता नाही**
- **45 लाख** युनिट आपला व्यवसाय पुन्हा सुरु करु शकतात.



# अडचणीतील MSMEs साठी रु. 20,000 कोटींचे अतिरिक्त कर्ज

- अडचणीतील लघुउद्योजकांना भागभांडवल मदतीची आवश्यकता
- सरकारने अतिरिक्त कर्जासाठी रु**. 20,000 कोटींची** तरतूद केली आहे
- **दोन लाख MSMEs** ना याचा लाभ
- कार्यरत MSMEs ज्या संकटात आहेत, त्या यासाठी पात्र
- CGTMSE ना सरकार **4,000 कोटी** रु. ची मदत पुरवेल
- CGTMSE बँकांना आंशिक कर्ज हमी मदत करतील
- उद्योजकांना बँका कर्ज देतील, ते नंतर भाग इक्विटी म्हणून वापरता येईल.





# रु 50,000 कोटी एमएसएमईंच्या फंड ऑफ फंडससाठी

- एमएसएमईकडे इक्विटीचा तुटवडा .
- फंड ऑफ फंडस (FoF) यासाठी **10,000 कोटी** रुपयांची तरतूद करण्यात येणार.
- एमएसएमईना वृद्धीसाठी इक्विटी पुरवठा**.**
- FoF **मदर फंड** आणि इतर फंडस **डॉटर फंड अशा** पद्धतीने कार्य करतील
- कन्याकोषअंतर्गत **50,000 कोटी** रुपयांची पत
- यामुळे एमएसएमईचा आकार आणि क्षमता वाढेल.
- MSMEs नी शेअर बाजाराच्या मुख्य बोर्डवर नोंदणी करण्यासाठी प्रयत्न.



# एमएसएमई उद्योगांची नवी संरचना

- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या कमी जोखीम पत्करण्याच्या संरचनेमुळे MSME उद्योजकांमध्ये लाभ मिळवण्याबाबत भीतीचे वातावरण होते आणि त्यामुळे उद्योगवाढीची आकांक्षाही नष्ट होत असे.
- त्यामुळे यात सुधारणा व्हावी, ही मागणी दीर्घकाळ प्रलंबित होती.

**घोषणा :**

- MSMEsची व्याख्या बदलली जाईल.
- **गुंतवणुकीची मर्यादा** वाढवली जाईल.
- **उलाढालीचे काही अतिरिक्त निकष** देखील निश्चित केले जातील.
- उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील फरक नष्ट केला जाईल.
- कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील.



# एमएसएमई उद्योगांची सध्याची आणि सुधारित संरचना

सत्यमेव जयते
Goverment Of India

| **सध्याच्या एमएसएमई मधील वर्गीकरण** | | | |
|---|---|---|---|
| **निकष: प्रकल्प आणि संयत्रे किंवा उपरकरणे यात केलेली गुंतवणूक** | | | |
| वर्गीकरण | सूक्ष्म | लघु | मध्यम |
| उत्पादक कंपन्या | गुंतवणूक< 25 लाख | गुंतवणूक< 5 कोटी | गुंतवणूक< 10 कोटी |
| सेवा कंपन्या | गुंतवणूक< 10 लाख | गुंतवणूक< 2 कोटी | गुंतवणूक< 5 कोटी |

| **MSME : सुधारित वर्गीकरण** | | | |
|---|---|---|---|
| **एकत्रित निकष : गुंतवणूक आणि वार्षिक उलाढाल** | | | |
| वर्गीकरण | सूक्ष्म | लघु | मध्यम |
| उत्पादक आणि सेवा कंपन्या | गुंतवणूक< 1 कोटी<br>आणि<br>उलाढाल< 5 कोटी | गुंतवणूक<10 कोटी<br>आणि<br>उलाढाल< 50 कोटी | गुंतवणूक<20 कोटी<br>आणि<br>उलाढाल< 100 कोटी |

# 200 कोटी रुपयांपर्यंत जागतिक निविदांना परवानगी नाही

- भारतीय MSME आणि इतर कंपन्यांना अनेकदा परदेशी कंपन्यांच्या अन्याय्य स्पर्धेला सामोरे जावे लागते.
- त्यामुळेच, सरकारी खरेदीप्रक्रियेच्या 200 कोटी रुपयांपर्यंतच्या निविदांमध्ये यापुढे जागतिक कंपन्याना बोली लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.
- त्यासाठी सामान्य वित्तीय नियमात आवश्यक त्या सुधारणा लागू केल्या जातील.
- आत्मनिर्भर भारताच्या दिशेने हे एक महत्वाचे पाऊल असेल आणि ‘मेक इन इंडिया’ला देखील सहाय्यभूत ठरेल.
- यामुळे MSME ना देखील आपला व्यवसाय वाढवण्याची संधी मिळेल.



# MSMEs साठी आणखी काही उपाययोजना

- कोविडमुळे एमएसएमई क्षेत्रात सध्या विपणन आणि तरलतेची समस्या निर्माण झाली आहे.
- व्यापारी मेळे आणि प्रदर्शनी यांना पर्याय म्हणून MSME क्षेत्राला **ई-मार्केट शी** जीडले जाईल.
- ई-मार्केटप्लेस ने संकलित केलेल्या डेटाचा वापर करत फिनटेक च्या मदतीने **व्यवहार-आधारित कर्ज देवघेव वाढवली** जाईल.
- MSME उत्पादन विक्रेत्यांना सरकार किंवा केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली देयके चुकती करण्यावर सरकार सातत्याने देखरेख ठेवत आहे.
- **सरकार आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांकडे बाकी असलेली सर्व देयके येत्या 45 दिवसात चुकती केली जातील**



# तीन महिने EPF सहाय्य देण्यासाठी 2500 कोटी रुपयांची तरतूद

- सगळे उद्योग जेव्हा पुन्हा सुरु होतील, तेव्हा त्यांना वित्तीय तणाव असणे स्वाभाविक आहे.
- प्रधानमंत्री गरीब कल्याण पैकेज अंतर्गत, पात्र आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांच्या EPF खात्यात, 12 % कंपनीचा आणि 12 % कर्मचाऱ्याचा वाटा सरकारने जमा केला आहे.
- ही मदत मार्च, एप्रिल आणि मे 2020 या वेतनमहिन्यांसाठी देण्यात आली.
- **आता ही रक्कम, पुढचे तीन महिने, म्हणजे जून, जुलै आणि ऑगस्ट 2020 या महिन्यांसाठी पण सरकारतर्फे भरली जाणार आहे.**
- यामुळे, 3.67 लाख आस्थापना आणि 72.22 लाख कर्मचाऱ्यांसाठी **2500 कोटी रुपयांची** मदत होणार आहे.



# व्यवसाय-उद्योग आणि कामगारांना 3 महिने आधार देण्यासाठी EPF योगदानात कपात – 6750 कोटी रुपयांची रोख मदत

- पुढच्या तिमाहीत आपले उत्पादन वाढवण्यासाठी उद्योगांना आर्थिक आधाराची गरज आहे.
- कर्मचाऱ्यांना अधिक वेतन आणि त्यासोबतच, मालकांना भविष्य निर्वाह निधीची देय रक्कम देण्यासाठी मदतीची गरज आहे.
- त्यामुळेच, सध्या कायद्यानुसार, PF मध्ये मालक आणि कर्मचारी दोघांसाठीही अनिवार्य असलेल्या 12 % वाट्याला 10 टक्यांपर्यंत कमी केले जाणार आहे. EPFO अंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांसाठी पुढचे 3 महिने ही सवलत लागू असेल.
- केंद्र आणि राज्यातील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्याना मात्र कंपनीचे योगदान म्हणून 12 टक्के रक्कम भरणे अनिवार्य आहे.
- जे कामगार/कर्मचारी प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत 24 % EPFO साठी पात्र नाहीत, त्यांच्यासाठीच ही योजना लागू असेल.
- या योजनेमुळे EPFOअंतर्गत सुमारे 6.5 लाख आस्थापनांना आणि त्यातील 4.3 लाख कर्मचाऱ्यांना आधार मिळेल.
- या योजनेअंतर्गत कंपन्या आणि कर्मचारी दोघांसाठीही पुढच्या 3 महिन्यांसाठी 6,750 कोटी रोख रुपयांची मदत देण्यात आली आहे.



# NBFCs/HFCs/ MFIs 30,000 कोटी रुपयांची विशेष तरलता योजना

- सध्या NBFCs/HFCs/ MFIs या संस्थाना ऋणबाजारातून पैसा उभा करणे कठीण जात आहे.
- सरकार, 30,000 कोटी रुपयांची विशेष तरलता(रोख रक्कम) योजना सुरु करणार आहे.
- या योजनेअंतर्गत, NBFCs/HFCs/ MFIs यांच्यातील गुंतवणूक श्रेणीनुसार, प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही स्वरूपाच्या बाजार व्यवहारात गुंतवणूक केली जाईल.
- यामुळे रिझर्व बँक/सरकारच्या बाजारात रोख तरलता आणण्याच्या प्रयत्नांना मदत मिळेल .
- या सिक्युरिटीज ची पूर्ण हमी केंद्र सरकार घेईल.
- यामुळे, NBFCs/HFCs/ MFIs आणि म्युचुअल फंड्स ना तरलता आधार मिळेल आणि बाजारात विश्वासाचे वातावरण निर्माण होईल.



# बिगर बँकिंग वित्तीय संस्थांसाठी
# 45,000 कोटी रुपयांची आंशिक पत हमी योजना



- एमएसएमई आणि वैयक्तिक नवीन कर्ज देताना कमी पत मानांकन असलेल्या एनबीएफसी, एचएफसी आणि एमएफआय यांना तरलता आवश्यक आहे.
- वरील संस्थांच्या बाँड / सीपी (वाणिज्यिक कागदपत्रे) (बॅलन्स शीट्मधील कर्जाची बाजू) यांच्या प्राथमिक वाटपासाठी सध्याच्या आंशिक पत हमी योजनेची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे.
- **पहिल्या 20% तोट्याची हमी भारत सरकार घेईल.**
- ए.ए. कागदपत्र आणि मानांकनाखालील कागदपत्र गुंतवणूकीसाठी पात्र (उदा. अनेक एमएफआयसाठी संबंधित)
- या योजनेमुळे 45,000 कोटी रुपयांची तरलता निर्माण होईल.

# डिस्कॉमसाठी 90,000 कोटी रुपयांची आर्थिक गुंतवणूक

- उर्जा वितरण कंपन्यांच्या (डिस्कॉम) महसुलात घट.
- **मागणीमध्ये कपात झाल्यामुळे अभूतपूर्व रोकड प्रवाह समस्या.**
- डिस्कॉमकडून वीज निर्मिती आणि वितरण कंपन्यांना 94,000 कोटी रुपये सध्या देय आहे.
- **ग्राहकांकडून थकीत असलेल्या बिलांसमोर पीएसएएफसी / आरईसी डिस्कॉमला 90,000 कोटी रुपयांची आर्थिक मदत करेल.**
- डिस्कॉम्सची जेनकोला देय असलेली रक्कम चुकती करण्यासाठीच्या विशेष उद्देशाने राज्य हमीच्या समोर कर्ज दिले जावे.
- **विशिष्ट क्रियांचा / सुधारणांचा दुवा: ग्राहकांसाठी डिस्कॉम्सद्वारे डिजिटल पेमेंटची सुविधा, राज्य सरकारांच्या थकबाकीची तरतूद, आर्थिक आणि परिचालन नुकसान कमी करण्याची योजना.**
- केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन कंपन्या डिस्कॉम्सला सवलत देतील जी अंतिम ग्राहकांपर्यंत (उद्योगांना) पोहचवली जाईल.



# कंत्राटदारांना दिलासा

- **सर्व केंद्रीय संस्थांनी (रेल्वे, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, इत्यादी) 6 महिन्यांपर्यंतची मुदतवाढ (कंत्राटदाराला खर्चाशिवाय) द्यावी.**
  - बांधकाम / कामे आणि वस्तू व सेवा करार यात अंतर्भूत.
  - काम पूर्ण करणे, दरम्यानचे टप्पे इ. आणि पीपीपी करारामध्ये सवलतीचा कालावधी वाढविणे यासारख्या जबाबदाऱ्यांचा समावेश.
- **रोख रकमेचा प्रवाह सुलभ करण्यासाठी करार अंशतः पूर्ण झाल्यावर सरकारी संस्था बँक हमी अंशतः  मुक्त करतील.**



# रेरा अंतर्गत बांधकाम क्षेत्र प्रकल्पांची नोंदणी आणि पूर्ण होण्याच्या तारखेला मुदतवाढ



- कोविडच्या पार्श्वभूमीवर झालेल्या प्रतिकूल परिणामांमुळे रेराने दिलेल्या मुदतीत प्रकल्प पूर्ण न होण्याचा धोका आहे. त्यामुळे मुदत वाढ आवश्यक आहे.
- गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय राज्य / केंद्रशासित प्रदेश आणि त्यांच्या नियामक प्राधिकरणाला पुढील गोष्टींकरिता सल्ला देईल:
  - रेरा अंतर्गत कोविड-19 ला 'नियंत्रणापलीकडील परिस्थिती' समजावी.
  - 25 मार्च 2020 रोजी किंवा त्या नंतर कालबाह्य होत असलेल्या सर्व नोंदणीकृत प्रकल्पांसाठी वैयक्तिक अनुप्रयोगांशिवाय नोंदणी आणि समाप्तीची तारीख 6 महिन्यांपर्यंत वाढविण्यात यावी.
  - आवश्यक असल्यास नियामक प्राधिकरण हे आणखी 3 महिन्यांपर्यंत वाढवू शकतात.
  - सुधारित वेळापत्रकासह आपोआप नवीन 'प्रकल्प नोंदणी प्रमाणपत्रे' द्यावी.
  - रेरा अंतर्गत एकाचवेळी विविध संवैधानिक अनुपालनासाठी मुदतवाढ द्यावी.

  - या उपाययोजना बांधकाम क्षेत्रातील विकासकांना ताणतणाव मुक्त करतील आणि प्रकल्पांची पूर्तता सुनिश्चित करतील जेणेकरुन गृहनिर्माण ग्राहकांना नवीन वेळापत्रकानुसार नोंदणी केलेल्या घरांचा ताबा मिळू शकेल.

# टीडीएस / टीसीएस दर कपातीद्वारे 50,000 कोटी रुपयांची तरलता

- करदात्यांना अधिक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी, करदात्यांना वेतनाव्यतिरिक्त मिळालेल्या उत्पन्नावरील कर वजावटीचे स्रोत (टीडीएस) आणि निर्दिष्ट उत्पन्नासाठी कर संकलनाचे दर (टीसीएस) विद्यमान दरांच्या 25% कमी केले जातील.
- कराराची फी, व्यावसायिक फी, व्याज, भाडे, लाभांश, कमिशन, दलाली इत्यादी गोष्टी टीडीएसच्या या कमी दरासाठी पात्र ठरतील.
- ही कपात आर्थिक वर्ष 2020-21 च्या उर्वरित काळासाठी म्हणजेच उद्यापासून 31 मार्च 2021 पर्यंत लागू असेल.
- **या उपाययोजनांमुळे 50,000 कोटी रुपयांची तरलता निर्माण होईल.**



# इतर प्रत्यक्ष कर उपाययोजना

- धर्मादाय संस्था आणि बिगर-कॉर्पोरेट व्यवसाय आणि मालकी, भागीदारी, मर्यादित दायित्व भागीदारी आणि सहकारी संस्थांसह व्यवसायांना सर्व प्रलंबित परतावा त्वरित देण्यात येईल.

- **आर्थिक वर्ष 2019-20 च्या आयकर परताव्याची तारीख, 31 जुलै 2020 आणि 31ऑक्टोबर 2020 पासून 30 नोव्हेंबर 2020 पर्यंत वाढविण्यात आली आहे आणि कर लेखापरीक्षणाची तारीख 30 सप्टेंबर, 2020 पासून 31 ऑक्टोबर, 2020 पर्यंत वाढविण्यात आली आहे.**



# इतर प्रत्यक्ष कर उपाययोजना

- **30 सप्टेंबर, 2020 रोजी मुदतबाह्य होणाऱ्या कर निर्धारणाची तारीख 31 डिसेंबर, 2020 पर्यंत वाढविण्यात आली आहे आणि 31 मार्च, 2021 पर्यंत मुदतबाह्य होणाऱ्यांची मुदत 30 सप्टेंबर, 2021 पर्यंत वाढविण्यात आली आहे.**

- अतिरिक्त रकमेशिवाय देयक देण्यासाठी विवाद से विश्वास योजनेचा कालावधी 31 डिसेंबर 2020 पर्यंत वाढविण्यात येईल.



सत्यमेव जयते
Goverment Of India

# धन्यवाद